**"जून २०२१" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ७ जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली माहे मे २०२१ च्या वेतनाकरित रु.४,७४,४७९/- इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.
- दिनांक ८ जून २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेलल्या ३ उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक २२ जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये अ.भा.से. (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम २००७ प्रमाणे सन २०२०-२१ मध्ये ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या महाराष्ट्र संवर्गातील भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांकरिता वैद्यकिय तपासण्या करण्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत वाढविण्यात आली आहे.
- दिनांक २२ जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत विहित मार्गाने गट-अ व गट-ब या राजपत्रित पदांवर सरळसेवेव्दारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तींसाठी नवीन परिविक्षाधीन धोरण निश्चित करण्यात आले आहे.
- दिनांक २२ जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये शासनाच्या चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या मुलास / अविवाहित मुलीस शासनाच्या सेवेत नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयाच्या शिफारशीची अट रद्द करण्याचे दिनांक १४ एप्रिल १९८१ व १० डिसेंबर १९८१ चे शासन परिपत्रक रद्द करण्यात येऊन, दिनांक १९ नोव्हेंबर २००३ च्या शासन परिपत्रकानुसार गट-क व गट-ड मधील पदभरतीच्या संदर्भात कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
- दिनांक २३ जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीच्या अनुषंगाने टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याच्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक २४ जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद या संस्थेला विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनासाठी ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.१५.०० लाख (दुसरा हप्ता) इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.
- दिनांक २४ जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेला विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्च तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनासाठी ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.१८.७५ लाख (दुसरा हप्ता) इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

**(ख) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक १७ जून २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखकांसाठी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा सन २०२१ करिता दिनांक १० जुलै २०२१ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे.
- दिनांक १८ जून २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये अनुत्तीर्ण सहायक कक्ष अधिकाऱ्यांची कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी विभागीय परीक्षा सन २०२१ ही दिनांक २६ व २८ जून २०२१ रोजी मंत्रालय मुख्य इमारत सातवा मजला येथे घेण्यात येणार आहे.

**(ग) नियुक्ती / पदोन्नती / प्रपत्र बढती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- ३१ उपसचिवांना सहसचिव पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.
- एका अवर सचिवावा उपसचिव पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

- २ कक्ष अधिकाऱ्यांना अवर सचिव पदावर पदोन्नती देण्यात आली आहे
- एका लघुटंकलेखकांला निम्नश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.
- ३५ निन्मश्रेणी लघुलेखकांना उच्चश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.
- ३ उच्चश्रेणी लघुलेखकांना निवडश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.
- एका अधिकाऱ्याच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**<u>(घ) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील ११ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- सहसचिव-१, उपसचिव-२ अशा ३ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत
- एका उच्चश्रेणी लघुलेखकाच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.

**<u>(च) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- अवर सचिव-२, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ३ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.

****